अर्जदारातर्फे साक्षीदार क्र. २ (नंदकुमार श्रीनिवास पोकलवार ) यांचा उलटतपास गैरअर्जदार क्र. १ व २ तर्फे विधीज्ञ श्री. एस.एस. सुर्यवंशी -

१. दि. ०१.१०.२००७ रोजी मी नागनाथ खराडे यांच्या शेतात गेलो होतो. त्या वेळेस त्यांच्या जमिनीतील विहिर व दगडी पौळ संपादीत क्षेत्रामध्ये जाणार आहे, याची मला माहिती झाली होती. मी भूसंपादन अधिकारी यांना नोटीसा दिल्या नाहीत. त्या वेळेस तलाठी, ग्रामसेवक हे कार्यरत होते याची मला माहिती नाही. मी त्यांना स्थळ पाहणीच्या अनुषंगाने नोटीसा दिल्या नव्हत्या. हे म्हणणे खरे नाही की, मुल्यांकन असोशियशनच्या नियमानुसार ज्या वेळेस आम्ही मुल्यांकन करणार असतो, त्यावेळेस संबंधीतांना नोटीसा देणे बंधनकारक आहे. माझ्याकडचे डीएसआर व सरकारचे डीएसआर याचे तुलनात्मक परिक्षण मी केले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मुल्यांकन अहवाल देतेवेळेस तुलनात्मक परिक्षण करणे बंधनकारक आहे. हे म्हणणे खरे नाही की, ज्या वेळेस मी मुल्यांकन अहवाल दिलेला आहे त्यावेळेस मी सरकारमान्य मुल्यांकन अधिकारी नव्हतो. हे म्हणणे खरे आहे की, मी जे मेंबरशिपचे प्रमाणपत्र दाखल केले आहे ते २१.०२.२०१२ रोजीचे आहे. हे म्हणणे खरे नाही की, ते प्रमाणपत्र खाजगी संस्थेचे आहे, सरकारचे नाही. हे म्हणणे खरे नाही की, ज्या दिवशी मी मुल्यांकन अहवाल दिलेला आहे, त्या दिवशी मी सरकार मान्य मुल्यांकन अधिकारी नव्हतो, त्यामुळे मी दिलेला मुल्यांकन अहवाल चुकीचा आहे. दि. ११.०५.२००१ रोजी मी मुल्यांकन अहवाल तयार केला.
प्रश्न – २४ ते २५ वर्षापुर्वीचा दस्त जीर्ण असतो?
उत्तर - ठेवण्यावर असतो.

२. हे म्हणणे खरे नाही की, मुल्यांकन अहवालावर जो शिक्का आहे, तो २४ वर्षापुर्वी तसा नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मुल्यांकन अहवाल मी अर्जदारासोबत संगनमत करुन शपथपत्र दाखल करण्यापुर्वी माझ्या कार्यालयात बसुन लिहिले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी चुकीचे मुल्यांकन केलेले आहे व जास्तीची रक्कम दाखवलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी नागनाथ खराडे यांच्या जमीन गट क्र. ५०४ मध्ये कधीही गेलेलो नव्हतो व मी तेथे कसल्याही प्रकारचे विहीरीचे व दगडी पौळचे मुल्यांकन केले नाही. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदाराचा फायदा होण्याकरीता मी चुकीचे शपथपत्र दाखल केले व चुकीचा मुल्यांकन अहवाल तयार केले व आज रोजी चुकीची साक्ष देत आहे.

गैरअर्जदार क्र. ३ तर्फे उलटतपास विधीज्ञ श्री. बारबोले यांचेकडुन सुरु -

३. हे म्हणणे खरे नाही की, मी सरकार मान्य मुल्यांकन अधिकारी नाही. मी त्याबाबतचे प्रमाणपत्र दाखल केलेले आहे. मी नागनाथ खराडे यांच्या जमिनीमध्ये मुल्यांकन करण्याकरीता दि. ०१.१०.२००७ रोजी गेलो होतो. मी विहिर, पौळ, एन ए पोटॅनशिअल असलेली जमीन याचे मुल्यांकन करतो. हे म्हणणे खरे आहे की, खराडे यांची जमीन संपादीत झाल्यानंतर ती शासनाची होती. हे म्हणणे खरे नाही की, शासनाची जमीन असल्यानंतर तेथे जाण्याकरीता व मोजमाप घेण्याकरीता शासनाची परवानगी लागते. हे म्हणणे खरे नाही की, नागराथ खराडे यांच्या जमीनीचे मुल्यांकन करते वेळी त्याठिकाणी नागनाथ खराडे हजर नव्हते. संपादीत झालेल्या जमिनीच्या चतु:सिमा मला सांगत येणार नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, मी ज्या दिवशी मुल्यांकन करण्याकरीता खराडे यांच्या जमीनीमध्ये गेलो होतो, त्याच दिवशी मुल्यांकन अहवाल तयार केला याबाबत माझेकडे कागदोपत्री पुरावा नाही. मी मुल्यांकन करतेवेळेस अर्जदारासोबत छायाचित्र किंवा व्हीडीओ काढले नाहीत. मी विहिरीचे मुल्यांकन करतेवेळी त्याचे फोटो काढले नाहीत. मी विहिरीचे मोजमाप केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी जे रक्कम रुपये २,५३,२८२/- (दोन लाख त्रेपन हजार दोनशे ब्याऐंशी) मुल्यांकन केले आहे ते अंदाजे केले आहे. मी ते मुल्यांकन डीएसआरच्या आधारे केले होते. मी त्याची प्रत या कामी दाखल केलेली नाही. मी केलेले मुल्यांकन बरोबर आहे कारण ते डीएसआर प्रमाणे केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी मुल्यांकन माझे कार्यालयात बसुन केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी नागनाथ खराडे यांच्या शेतात कधीही गेलो नाही. हे म्हणणे खरे नाही की, खराडे यांना जास्तीत जास्त रक्कम मिळावी म्हणून मी घरी बसुन खोटा मुल्यांकन अहवाल तयार केला. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

AWASEKAR SWATI DILIPRAO
Digitally signed by AWASEKAR SWATI DILIPRAO
Date: 2025.10.30 14:42:49 +0530

दिनांकः २९.१०.२०२५

(श्रीमती. एस. डी. अवसेकर )
दिवाणी न्यायाधीश, व स्तर, तुळजापूर.

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P. D.F. file judgment /order/issues /evidence are same, word to word, as per the original judgment/order/issues/evidence.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | --- | Devidas S. Shiral,<br>Stenographer - Grade II |
| Court | --- | Smt. S. D. Awasekar<br>Civil Judge, Senior Division, Tuljapur, District -Dharashiv. |
| Date | --- | 29/10/2025 |
| Judgment/order/issues/evidence signed by the Presiding Officer on | --- | 29/10/2025 |
| Judgment/order/issues/ evidence uploaded on | --- | 30/10/2025 |